**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

# विक्रीकर निरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०१४

## अंतिम निकाल

## घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक १८ ऑगस्ट, २०१५ रोजी घेण्यात आलेल्या **विक्रीकर निरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०१४** च्या एकूण ४४५ पदांचा निकाल संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मुळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अधीन राहून **दिनांक १ मार्च, २०१६** रोजी जाहीर करण्यात आला आहे.

**२.** सदर परीक्षेमध्ये येथील **श्री. वन्से देविदास सुभाष [भ.ज.(क)]** हे राज्यातून व मागासवर्गीयांमधून प्रथम आले आहेत तसेच महिला वर्गवारीतून **औरंगाबाद** येथील **श्रीमती. नाटकर अश्विनी विश्वंभर** हया राज्यातून प्रथम आल्या आहेत.

**३.** गुणवत्ताधारक खेळाडूंच्या आरक्षित पदावर नेमणूकीकरिता शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांची शिफारस त्यांची क्रीडा विषयक प्रमाणपत्रे संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांनी नियुक्तीपूर्वी तपासण्याच्या व ती पात्र ठरण्याच्या अधीन राहून शासनाकडे करण्यात येत आहे.

**४.** प्रस्तुत अंतिम निकालात शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसात, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमून्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्र. ३.८ पहावी)

**५.** प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीत शासनाच्या मागणीपत्रानुसार शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गाकरीता पदे आरक्षित दर्शविण्यात आली होती. प्रस्तुत आरक्षणासंदर्भात सामान्य प्रशासन विभाग शुध्दीपत्रक दिनांक २ डिसेंबर, २०१५ परिच्छेद 'इ' येथील तरतूद व तद्अनुषंगाने शासनाच्या दि. ५ फेब्रुवारी, २०१६ च्या पत्रान्वये प्राप्त झालेले अभिप्राय तसेच रिट याचिका क्र. ३१५१/२०१४ वरील मा. उच्च न्यायालयाच्या होणा-या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर निकाल जाहिर करण्यात येत आहे.

**विजया पडते**
**उप सचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**

**दिनांक - १ मार्च, २०१६**
**ठिकाण - मुंबई.**